**मे.एसआरजे पित्ती स्टील प्रा.लि. प्लॉट नं. डी-५०/१, डी-५०/२, डी-५१/१, डी-५१/२, डी-५२/१, डी-५२/२, ई-८/९, ई-८/१०, ई-८/१० भाग, ई-४५, ई-४६, ई-४७, बी-२९, बी-२९/१, बी-३०/१/१, बी-३०/१, बी-३०/२, बी-३०/३, अतिरीक्त एमआयडीसी फेज-१ आणि २, ता. जालना, जिल्हा जालना, महाराष्ट्र या उदयोगाच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये एम.एस. बिलेटस १००० टी.पी.डी. ते २००० टी.पी.डी. व टी.एम.टी. बारस १००० टी.पी.डी. ते २००० टी.पी.डी. चे उत्पादन करणे बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत:**

..............................................................................................................................

मे.एसआरजे पित्ती स्टील प्रा.लि. प्लॉट नं. डी-५०/१, डी-५०/२, डी-५१/१, डी-५१/२, डी-५२/१, डी-५२/२, ई-८/९, ई-८/१०, ई-८/१० भाग, ई-४५, ई-४६, ई-४७, बी-२९, बी-२९/१, बी-३०/१/१, बी-३०/१, बी-३०/२, बी-३०/३, अतिरीक्त एमआयडीसी फेज-१ आणि २, ता. जालना, जिल्हा जालना, महाराष्ट्र या उदयोगाच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये एम.एस. बिलेटस १००० टी.पी.डी. ते २००० टी.पी.डी. व टी.एम.टी. बारस १००० टी.पी.डी. ते २००० टी.पी.डी. चे उत्पादन करणे बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली दि. २८ आक्टोबर २०२० रोजी सकाळी ११:०० वाजता प्रस्तावित स्थळी घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-६४ / २०२० पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २०१०२३-एफटीएस-०१०३ दि. २३/१०/२०२० अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी, जालना | : | अध्यक्ष |
| २. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद | : | सदस्य |
| ३. | उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना | : | समन्वयक |

डॉ. योगिनी बाळंखे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १०/०९/२०२० रोजी प्राप्त झाला होता. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी जालना, तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांच्या परवानगीने दिं. २८/१०/२०२० रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्याबाबत जाहीरात दिं. २६/०९/२०२० रोजी मराठी दैनिक सकाळ व टाईम्स ऑफ इंडिया ईंग्रजी या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सदर प्रकल्पाविषयी पर्यावरण मुल्याकंन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तावेज (इंग्रजी व मराठी) मध्ये संबंधीत ग्रामपंचायत कार्यालय व इतर शासकीय कार्यालयांमध्ये इच्छूक व्यक्तींना अभ्यासण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्ताऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
- जिल्हा उदयोग केंद्र, जालना.
- जिल्हा परिषद, जालना.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय जालना.
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, कार्यालय, जालना
- उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ जालना.

- प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (मुख्यालय).
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पुर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, श्री. भरत मानकर व श्री. अर्पण गोयल यांची टिका/टिप्पणी या कार्यालयास दिं. २७.१०.२०२० रोजी प्राप्त झाली आहे. सदर प्रत प्रकल्प धारकाकडे सुपूर्द केली जेणेकरून त्यावरील खुलासा त्यांच्याकडून प्राप्त झाल्यावर ईतिवृत्तासोबत जोडता येईल.

समन्वयक यांनी प्रकल्प धारकांस आणि प्रतिनिधी यांना सादरीकरण करण्याचे विनंती केली.

प्रकल्पाचे प्रतिनिधी मे. परामर्श सर्व्हिसिंग एनवायोरोमेंट आणि डेवलपमेंट, श्री. राजेश मानकर, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांमध्ये नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे सादरीकरण समाप्त केल्यानंतर डॉ. योगिनी बाळंखे यांनी सार्वजनिक सहभागींना विनंती केली कि, सदर प्रकल्पासंबंधी जर कुणाला काही प्रश्न,

सूचना, आक्षेप असतील तर ते त्यांनी त्यांचे नाव व गावाचे नाव सांगून विचारावेत. आणि प्रकल्प प्रवर्तकाने त्याचे समाधानकारक उत्तर द्यावे.

जाहीर लोकसुनावणी दरम्यान सार्वजनिक सहभागींनी सदर प्रकल्पासंबंधित काही प्रश्न, सुचना, आक्षेप उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१. **श्री. गणेश नन्नवरे, रा. देवपिंपळगाव** यांनी मुददा उपस्थित केला की, पर्यावरण व्यवस्थापन म्हणजे काय ?
२. **श्री. सूरेश किशन हराळे, रा. इंदेवाडी** यांनी मुददा उपस्थित केला की, नविन प्रकल्पासाठी लागणारे मनूष्यबळ त्यासाठी शिक्षण काय असणार आहे ?
३. **श्री. गणेश तूकाराम ढवळे, माजी सरपंच, दरेगाव, रा. दरेगाव** यांनी मुददा उपस्थित केला की, सीईआर फंडामधून आपण वृक्षारोपण आणि आरोग्य शिबीर अशा योजना राबवले आहेतच. तसेच येणा-या वर्षामध्ये आपण दरेगाव ग्रामपंचायत येथे सार्वजनिक शौचालये बांधून देता येईल का ?
४. **श्री. बालाजी शिवाजी मराठे, रा. ढोकसाळ** यांनी मुददा उपस्थित केला की, येणा-या प्रकल्पामध्ये आरोग्याविषयी आपण काय काळजी घेणार आहात.
५. **श्री. गौरव मानकस, अयोध्या नगर जालना**, यांनी मुददा उपस्थित केला की, या प्रकल्पाचे फायदे काय आहेत.
६. **श्री. जावेद पठाण, रा. चंदनझिरा**, यांनी मुददा उपस्थित केला की, प्रकल्पामधून निघणा-या घनकच-याची विल्हेवाट कशी लावणार आहात.
७. **श्री. संदिप सुभाष नवले, रा. अंबड चौफूली जालना**, यांनी मुददा उपस्थित केला की, स्थानिकांसाठी काय उपाययोजना आहेत.
८. **श्री. गणेश अंकूश शिंदे, रा. जालना**, यांनी मुददा उपस्थित केला की, नविन प्रकल्पासाठी लागणारे पाणी कसे उपलब्द होईल.
९. **श्री. नितीन अंभोरे, रा. शेलगाव**, यांनी मुददा उपस्थित केला की, समाजासाठी आपल्या काय योजना आहेत.

वरिल सर्व मुददयांवर प्रकल्पाचे प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी त्यांच्याकडून करण्यात येणा-या उपाय योजनांची माहिती दिली. सुरूवातीला उद्योगांचे प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जालना तसेच सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद व उपस्थित सर्व नागरिक, गावकरी यांचे स्वागत केले. नागरिकांनी प्रश्न, टिका, सूचना, आक्षेप उपस्थित केले आहेत त्याअनूषंगांने कंपनीचे प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी नागरिकांच्या सर्व प्रश्नावर उजळणी केली. सर्वप्रथम पर्यावरण हाताळणी संबंधित त्यांनी सांगितले की, यासाठी एकूण १४ कोटी ची तरतुद केली आहे. त्यामध्ये १०.५० कोटी हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा उभारण्यासाठी लागणार आहेत तसेच १ कोटी हे ध्वनी प्रदूषण होवू नये यासाठी ध्वनीरोधक यंत्रणा (Acoustic enclosure System) बसवण्यात येणार आहे. तसेच सांडपाणी व्यवस्थापणासाठी ची यंत्रणा राहणार आहे. आरोग्य आणि सूरक्षा पायाभूत सुविधासाठी जवळपास २५ लाख व हरित पटटा विकासासाठी ५० लाख नियोजित केले आहे. तसेच भविष्यात या सर्व यंत्रणांवर देखभालीसाठी ८५ लाखांची तरतूद केलेली आहे.

तसेच पूढे रोजगार निर्मिती च्या प्रश्नावर त्यांनी सांगितले की, शिक्षीत व अशिक्षीत असे रोजगार नव्याने लागणार आहेत.

तसेच पूढे शौचालये बांधकामाच्या प्रश्नावर त्यांनी सांगितले की, सीइआर च्या ५७ लाख नियोजीत निधीमधून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नविन शौचालये बांधण्यात येतील.

तसेच पूढे नविन विस्तार प्रकल्पामध्ये आरोग्याविषयी आपण काय काळजी घेणार आहात या प्रश्नावर त्यांनी सांगितले की, नविन कामगारांसाठी लागणारे मास्क, ॲप्रण (कोट), हातमोजे तसेच हेल्मेट या सर्व वस्तू कामगारांना त्यांच्या सूरक्षेसाठी पूरविल्या जाणार आहेत. त्याव्यतिरीक्त कंपनीमध्ये कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी २४ तास क्लिनीक, डॉक्टर रुग्णवाहिका ची व्यवस्था केलेली आहे. तसेच कामगारांचे वेळोवेळी आरोग्य तपासणी, रक्तदान शिबीर चे आयोजन केले जाणार आहे.

तदनंतर प्रकल्पाचे फायदे काय या प्रश्नावर त्यांनी असे सांगितले की, हा नविन प्रकल्प असणार या नविन प्रकल्पामध्ये नविन गुंतवनूक असणार त्यामूळे नव्याने उत्पादन क्षमता राहील तसेच नविन कामगार निर्मिती होईल त्याअनुषंगाने स्थानिक लोकांना येथे संधी राहणार आहे.

तदनंतर नागरिकांनी उपस्थित केलेल्या स्लॅग/घनकचराबाबत प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी नमूद केले की, सदर प्रस्तावित प्रकल्पामध्ये स्लॅग क्रशिंग युनिट बसवण्यात येणार आहेत. स्लॅग मधील मेटल परत उत्पादनामध्ये वापरला जाईल तसेच नॉन मेटल हा स्लॅग क्रशिंग युनिट मध्ये क्रश केल्या जाईल व क्रश केलेला स्लॅग वाळू सारखा बांधकामामध्ये वापरला जाईल.

प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी स्थानिकांसाठी काय उपाययोजना आहेत याबाबत असे नमूद केले की, सूरु असलेल्या कंपनीमध्ये ७०० रोजगार कार्यरत आहेत त्यामध्ये ५५० कामगार हे स्थानिक जालना जिल्हयातील आहेत व १५० कामगार हे जालना जिल्हयातील आजूबाजूच्या गावातीलच आहेत. सदर प्रस्तावित प्रकल्पामध्ये १५० नविन कामगार जोडण्यात येणार असून यामध्ये सुदधा स्थानिक लोकांनाच प्राधाण्य देण्यात येणार आहे.

तदनंतर प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी नविन प्रकल्पासाठी लागणारे पाणी कसे उपलब्ध होईल यावर असे नमूद केले की, कंपनीने शेततळे बनविले आहे त्यामध्ये एका शेततळयात १५ कोटी लीटर पाणी तसेच दूस-या शेततळयात जवळपास ५ कोटी लीटर पाणी साठा उपलब्ध आहे त्यामूळे नविन विस्तार प्रकल्पासाठी लागणा-या पाण्याची अडचण निर्माण होणार नाही.

तदनंतर प्रतिनीधी श्री. सूरेंद्र पित्ती यांनी सामाजीक योगदान बाबत असे सांगितले की, सद्य:स्थितीत कोरोनाची महामारी आलेली आहे त्यामध्ये एसआरजे पित्ती स्टिल प्रा.लि. या कंपनीने मा. जिल्हाधिकारी यांच्या सहायाने २०० खाटांचा कोविड दवाखाना बनविण्यासाठी ३३ लाखांचे योगदान दिले आहे. जालना जिल्हायातील घाणेवाडी तलाव आहे त्याची गाळ काढणे यामध्ये देखील कंपनीचे योगदान दरवर्षी असते. सिवील हॉस्पीटल मध्ये गरजू लोकांना कंपनीतर्फे मोफत अन्नदान वाटप करण्यात येते. त्यानंतर जालना जिल्हायातील गौशाळा देखभाल, डोळयांच्या हॉस्पीटलचे देणगी, डायबिटीज सेंटर देणगी अशा इतर सामाजिक योगदान हे दरवर्षी होतच असते व ते पूढेही कंपनीतर्फे सूरू असणार. तसेच दरवर्षी जिल्हयातील जवळपास ४ ते ५ विद्यार्थी १२ वी पास यांचे पूढिल शिक्षणासाठी कंपनीतर्फे मदत केली जाते. त्यानंतर त्यांनी आनंदाने सांगितले की, एकल संस्था अशी एक संस्था आहे ज्यामध्ये नविन शाळा बांधण्यासाठी कंपनीने जवळपास ३३ लाखांचे योगदान दिलेले आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नविन शौचालये बांधण्यासाठी कंपनीने नगर परिषद जालना यांना ११ लाखांचे योगदान देण्यात आले होते. तसेच वन विभागासाच्या विकासासाठी सुदधा कंपनीने जवळपास

११ लाखांचे योगदान देण्यात आले होते. तसेच त्यांनी पुढे सांगितले की, सामाजिक विकासासाठी कंपनीचे योगदान दरवर्षी चालतच असते व ते पुढेही सूरू राहणार आणि यासाठी कंपनी नेहमी कटिबध्द राहील.

सदर जाहीर लोक सुनावणीचे सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी काही सुचना प्रकल्प धारकास केल्या. प्रकल्प सल्लागार यांनी EIA ड्राफट सादरीकरण करताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्रानूसार सादरीकरण केले पाहीजे तसेच संमतीपत्रातील अटी व शर्तीचे पालन करुनच प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात यावी.

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जालना यांनी सर्वप्रथम परिसरातील सर्व नागरिक, कंपनीचे संचालक, कंपनीचे प्रवर्तक व म.प्र.नि. मंडळाचे सर्व अधिकारी यांचे स्वागत केले तसेच नमूद केले की, आजच्या कोविड-१९ (कोरोना स्थिती) च्या पार्श्वभूमीवर सोशल डिस्टंन्सिंगचे (सुरक्षित अंतर) योग्यरितीने पालन करण्यात आले आहे. तसेच सॅनिटायझर, मास्क ची व्यवस्था देखील उत्तम केलेली आहे. सदर प्रकल्पाबाबत एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे व तो कंपनी व्यवस्थापनाकडे पाठविण्यात आलेला आहे. तदनंतर त्यांनी नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्न/आक्षेप यांची थोडक्यात उजळणी केली. तसेच त्यांनी सांगितले की, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी काही सुचना प्रकल्प धारकास केल्या त्या अतिशय योग्य आहेत व त्याचे तंतोतंत पालन करण्यात यावे. तसेच म.प्र.नि. मंडळाच्या नियमानूसार ऑनलाईन मॉनिटरींग सिस्टिम बसविण्यात यावी अशी सूचना देखील प्रकल्पधारकास त्यांनी केली. तसेच पुढे साहेबांनी असे सुचित केले की, कंपनीतील कामगारांसाठी प्रधानमंत्री जिवन ज्योती योजना व प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना लागू करावी. या दोनही योजना अत्यंत अल्प दरात उपलब्ध असल्याबाबतही त्यांनी नमूद केले. तसेच अस्तित्वात असलेल्या उद्योगासाठी तसेच नविन प्राकल्पासाठी देखील या योजना लागू करुन घ्याव्यात असा आग्रह अध्यक्ष साहेबांनी केला. यानंतर त्यांनी आपले म्हणने समाप्त केले.

डॉ. योगिनी बाळंखे यांनी जाहीर लोकसूनावणी समितीचे अध्यक्ष व सदस्य यांच्या परवानगीने सार्वजनिक सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त केली.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

| | |
|---|---|
| **(डॉ. प्रविण जोशी)** | **( डॉ. योगिनी बाळंखे)** |
| सदस्य | समन्वयक |

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती

| | |
|---|---|
| तथा | तथा |
| प्रादेशिक अधिकारी | उप प्रादेशिक अधिकारी |
| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना |

**( रविंद्र बिनवडे )**
अध्यक्ष
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा
जिल्हाधिकारी, जालना